नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २८ | Issue - 28 | वार शनिवार दि. १४ जून २०२५ | Blow- Saturday Date 14 June 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com



# केंद्र सरकारचा मोठा निर्णय; बोईंग विमानांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश

## उड्डाणपूर्व बंधने ; डीजीसीएचे महत्त्वाचे निर्देश, विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडला : अपघाताचे कारण होणार स्पष्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अहमदाबाद विमान दुर्घटनेनंतर एअर इंडियाच्या बोईंग कंपनीच्या विमानावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अनेक दाखले देत ह्या विमानाच्या सुरक्षिततेवर आणि त्याच्या उड्डाणावर, तांत्रिक बाबींवर चर्चा होत आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देखील अपघाताच्या घटनेवर शोक व्यक्त करताना काही संदर्भ देत बोईंग विमानाच्या तांत्रिक बाबी तपासण्यासंदर्भात आवाहन केलं होतं. तर, बोईंग कंपनीविरुद्ध गेल्या काही वर्षांत अनेक तक्रारी आल्या आहेत. डीजीसीएने एअर इंडियाला सुरक्षा उपाययोजनांबाबत अनेक पत्रे लिहिली होती. अमेरिकन सरकार आणि संसदेनेही या प्रकरणाची चौकशी केली आहे, अशी माहिती नागरी उड्डाण मंत्रालयाच्या माजी सहसचिव सनत कौल यांनी ही माहिती दिली आहे. त्यामुळे, आता सरकारने बोईंग कंपनीच्या विमानासंदर्भाने मोठा निर्णय घेतला आहे. एअर इंडियाकडून तपासणीसंदर्भातला रिपोर्ट डीजीसीएला सुपूर्द करावा लागणार आहे.

डीजीसीएने एअर इंडियाला लिहिलेल्या पत्रात एअर इंडियाच्या देखभाल आणि तपासणी प्रक्रियेबद्दलही प्रश्न उपस्थित झाले आहेत. अहमदाबाद विमान अपघाताच्या तपासात आता एटीएसचीही एंट्री झाली आहे. तर, बोईंग विमानाच्या संदर्भातने केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एअर इंडिया विमान दुर्घटनेनंतर नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने म्हणजेच डीजीसीएने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, सरकारने बोईंग ७८७-८/९ विमानांच्या सुरक्षा तपासणीचे आदेश दिले आहेत. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून उ्न्न्न्छ ने एअर इंडिया कंपनीच्या बोईंग ७८७-८/९ विमानांच्या ताफ्यावर अतिरिक्त देखभाल आणि तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

१. १५ जून २०२५ पासून भारतातून उड्डाण करण्यापूर्वी प्रत्येक विमानाची तपासणी बंधनकारक: २. इंधन पॅरामीटर मॉनिटरिंग आणि संबंधित प्रणालींची तपासणी ३. केबिन एअर कंप्रेसर आणि संबंधित यंत्रणांची तपासणी ४. इलेक्ट्रॉनिक इंजिन कंट्रोल सिस्टिम चाचणी ५. इंधन चालित ॲक्युएटर व फ्युएल सिस्टिम तपासणी ६. हायड्रॉलिक प्रणालीची सेवा स्थिती तपासणी ७. टेकऑफ पॅरामीटर्सचा आढावा ८. 'फ्लाइट कंट्रोल इन्स्पेक्शन' ही प्रणाली तात्पुरत्या कालावधीत दरम्यानच्या तपासणीत समाविष्ट केली जाणार आहे. ९. पॉवर ॲश्युरन्स चेक पुढील दोन आठवड्यांत पूर्ण करणे आवश्यक. १०. मागील १५ दिवसांत झालेल्या तांत्रिक बिघाडांच्या पुनरावलोकनानंतरच देखभाल प्रक्रिया पूर्ण समजली जाईल.

विमान तंत्रज्ञानाबद्दल जरी मला खूप खोल माहिती नसली तरी माझ्या वाचनात काही गोष्टी याच्या आधी पण आल्या होत्या, त्यातून मला काही प्रश्न पडले. बोईंगच्या 'ड्रीमलाईनर' विमानाबद्दल खूप तक्रारी होत्या. २०१३ ला पहिल्यांदा जपान एअरलाईन्सच्या विमानाला आग लागली होती. त्यानंतर या विमानाबद्दल अनेक तक्रारी येतच होत्या. त्या इतक्या होत्या की २०२० ते २०२३ या काळात अनेकदा या विमानांचं उड्डाण थांबवलं गेलं होतं. जानेवारी २०१३ ला तर अमेरिकेपासून युरोपपर्यंत जवळपास सगळ्या मोठ्या विमान प्राधिकरणांनी जवळपास ३ महिने बोईंग ड्रीमलाईनरचं उड्डाण खंडित केलं होतं. आणि मला आठवतंय त्याप्रमाणे २०१३ ला भारतात डीजीसीएने देखील काही काळासाठी या विमानाचं उड्डाण खंडित केलं होतं. जर ड्रीमलाईनर बद्दल इतक्या तक्रारी आहेत हे माहित असून सुद्धा आपण ही विमानं का वापरू देत होतो ? डीजीसीएने यावर कधीच कोणती कारवाई का नाही केली ? आजच्या विमान अपघाताविषयी वाचताना अजून एक माहिती समोर आली ती म्हणजे हे विमान २८ जानेवारी २०१४ ला एअर इंडियाच्या सेवेत आलं. थोडक्यात जगभरात जेंव्हा ड्रीमलाईनरबद्दल तक्रारी होत्या त्याच दरम्यान आपण हे विमान ताफ्यात आणलं, असे राज ठाकरेंनी म्हटलं.

# मुंबईहून लंडनसाठी उड्डाण घेतलेलं विमान माघारी वळवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: गुजरातमधील अहमदाबाद इथं झालेल्या विमान अपघातानंतर संपूर्ण देश सुन्न झाला आहे. उड्डाण घेताच विमान कोसळल्याने एअर इंडियावरही चहुबाजूने टीकेची झोड उठली आहे. अशातच मुंबईतून आज पहाटे उड्डाण घेतलेलं एअर इंडियाचं एक विमान माघारी फिरवण्यात आलं आहे. इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर पश्चिम आशियाई प्रदेशात तणाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर एअर इंडियाने शुक्रवारी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी काही विमानांचे मार्ग बदलले, तर काही विमाने माघारी फिरवली. भारतीय दूतावासाने इराणमधील भारतीयांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे. शुक्रवारी सकाळी मुंबईहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे विमान एआयसी १२९ मुंबईला परतले.

एअर इंडियाने एकूण १६ विमानांना अन्य मार्गांवर वळवले किंवा ती ज्या ठिकाणाहून निघाली होती, तिथे परत पाठवली. इस्रायलने शुक्रवारी इराणच्या राजधानीवर हल्ला केला, ज्यामुळे तेहरानमधील तणाव वाढला आणि इराणने खबरदारी म्हणून आपली हवाई हद्द बंद केली.

प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी काही विमानांचे मार्ग बदलण्यात आले किंवा ती माघारी फिरवण्यात आली, असं एअर इंडियाकडून सांगण्यात आलं आहे.



# पंतप्रधान मोदींनी अपघात स्थळाला दिली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहमदाबाद : अहमदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ झालेल्या विमान अपघाताने संपूर्ण देश हादरून गेला आहे. विमान उड्डाणानंतर अवघ्या दोन मिनिटांतच कोसळले. या अपघातात २६५ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. एअर इंडियाच्या विमानात २४२ प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते, ज्यात १६९ भारतीय नागरिक, ५३ ब्रिटिश नागरिक, १ कॅनेडियन नागरिक आणि ७ पोर्तुगीज नागरिकांचा समावेश होता. या भयानक अपघातात फक्त एक प्रवासी बचावला, इतर सर्व २४१ जणांचा मृत्यू झाला. विमानाच्या ११-ए क्रमांकाच्या सीटवर बसलेले एकमेव भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक रमेश विश्वास कुमार अपघातातून बचावले. या अपघातानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनास्थळी भेट दिली आणि बचाव कार्यात गुंतलेल्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांनी तपास आणि मदत कार्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

अहमदाबादमधील विमान अपघाताची आठवण करून देताना ते म्हणाले की, तो क्षण अजूनही त्यांच्या डोळ्यांसमोर ताजा आहे. डीडी न्यूजशी बोलताना विश्वास म्हणाले, मला अजूनही विश्वास बसत नाही की मी जिवंत आहे. माझ्या डोळ्यांसमोर सर्व काही घडले. क्षणभर मला वाटले की माझा मृत्यू निश्चित आहे. ते म्हणाले की, विमान उड्डाणानंतर अवघ्या १० सेकंदातच कोसळले. विश्वास म्हणाला, असं वाटत होतं की विमान कुठेतरी अडकलं आहे. मग अचानक लाईट लागले आणि काही क्षणातच विमान वेगाने पुढे सरकलं आणि मग एक जोरदार टक्कर झाली. त्यांच्या मते, सगळं इतक्या वेगाने घडलं की कोणालाही काहीही समजण्याची संधी मिळाली नाही. विश्वास कुमार रमेश म्हणाले की ते विमान ज्या बाजूला पडलं त्या इमारतीऐवजी मोकळ्या मैदानात पडले होते. ते म्हणाले, माझ्या जवळची जमीन पूर्णपणे सपाट होती. दरवाजा तुटताच मला दिसलं की बाहेर पडण्याचा मार्ग आहे आणि मी लगेच तिथून पळून गेलो. विश्वास यांच्या डाव्या हाताला भाजलं होतं, पण ते सुरक्षितपणे बचावले. दुःख व्यक्त करताना ते म्हणाले, विमान ज्या बाजूने इमारतीला धडकले तिथून कोणीही बाहेर पडू शकले नाही. विश्वासचा भाऊ नयन कुमार रमेश म्हणाला की त्याचा भाऊ वाचला हे चमत्कारापेक्षा कमी नाही. त्याने सांगितले की अपघातानंतर काही मिनिटांनीच विश्वासने लेस्टरमध्ये त्याच्या वडिलांना फोन करून सांगितले की तो सुरक्षित आहे. विश्वास कुमार रमेश यांच्या भावाने सांगितले की, विमान कोसळले तेव्हा विश्वास यांनी ताबडतोब त्यांच्या वडिलांना व्हिडिओ कॉल केला आणि म्हणाले, बाबा, विमान कोसळले आहे. माझा भाऊ कुठे आहे हे मला माहित नाही. मला दुसरा कोणताही प्रवासी दिसत नाही. मी कसा वाचलो किंवा विमानातून कसा बाहेर पडू शकलो हे मला समजत नाही.

## मंदिर समितीच्या संकेतस्थळावरून आजपासून बुकिंग

# टोकन दर्शन प्रणालीची उद्यापासून प्रथम चाचणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंदिर समितीच्या दि. ०७ जून रोजीच्या सभेत टोकन दर्शन प्रणालीची दि. १५ जून रोजी प्रथम चाचणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या अनुषंगाने प्रथम चाचणी दिवशी सुमारे १२०० टोकन उपलब्ध होणार असून, त्याचे बुकींग भाविकांना मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून दि.१४ जून पासून उपलब्ध होत असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना सुलभ व जलद दर्शन देण्यासाठी टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस, बेंगलोर यांच्याकडून सेवाभावी तत्वावर टोकन दर्शन प्रणाली विकसित करून घेण्यात आली आहे. दरवर्षी वारकरी भाविकांची वाढती संख्या पाहता, भविष्यात दर्शन रांग आणि भाविकांच्या सोयींचे योग्य व्यवस्थापनावर काम करणे अत्यावश्यक आहे. या प्रणालीद्वारे भाविकांना आधीच दर्शनाची वेळ निश्चित करून दर्शनासाठी रांगेत न थांबता, ठरावित वेळेत दर्शनहॉलच्या माध्यमातून मंदिरात प्रवेश करता येणार आहे, ही प्रणाली

### भाविकांना सुलभ व जलद दर्शन देण्याचा मंदिर समितीचा प्रयत्न

विशेषत: गर्दीच्या काळात गर्दीचे व्यवस्थापन, भाविकांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होण्यास प्रभावी ठरेल.

टोकन दर्शन प्रणालीच्या प्रथम चाचणीचे टोकन दि. १४ जून रोजी सकाळी १०.०० पासून ु.िंर्ळीिंहरश्रींज्ञिाळपळारपवळी.ेिस या संकेतस्थळावरून बुकींग करता येणार आहे. ऑनलाईन पध्दतीने तयार झालेले टोकन प्रिंट करून, निश्चित करून दिलेल्या वेळी श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, पंढरपूरच्या उत्तरेकडील मागीस बाजूस प्रवेश करून टोकनची पडताळणी करून घेणे व तद्नंतर दर्शनहॉलमध्ये प्रवेश दिला जाईल व वेळेनुसार थेट दर्शन रांगेत प्रवेश होऊन भाविकांचे सुलभ दर्शन होणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

टोकन दर्शन प्रणालीची प्रथम चाचणी घेण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी अंतिम टप्प्यात आली आहे. त्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथील दुस-या व तिस-या माळ्यावर प्रतिक्षा हॉल तयार केले आहे.

त्याठिकाणी बैठक व्यवस्था, प्रसाधन गृह, पिण्याचे पाणी, चहा, सार्वजनिक सुचना प्रसारण प्रणाली, सुरक्षा रक्षक, दिशादर्शक व आपत्कालिन मार्ग फलक, सीसीटीव्ही कॅमेरे इत्यादी अनुषंगीक व्यवस्था करण्यात आली आहे.

या प्रथम चाचणीचा शुभारंभ मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते व सर्व सदस्य महोदयांच्या उपस्थितीत श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे दि. १५ जून रोजी सकाळी १०.०० वाजता होणार असल्याचे यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.



## संपादकीय....

### उपाययोजना हव्यात

अहमदाबाद आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ झालेल्या विमान अपघाताने संपूर्ण देश हादरून गेला आहे. विमान उड्डाणानंतर अवघ्या दोन मिनिटांतच कोसळले. या अपघातात २६५ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. एअर इंडियाच्या विमानात २४२ प्रवासी आणि क्रू मेंबर्स होते, ज्यात १६९ भारतीय नागरिक, ५३ ब्रिटिश नागरिक, १ कॅनेडियन नागरिक आणि ७ पोर्तुगीज नागरिकांचा समावेश होता. या भयानक अपघातात फक्त एक प्रवासी बचावला, इतर सर्व २४१ जणांचा मृत्यू झाला. विमानाच्या ११-ए क्रमांकाच्या सीटवर बसलेले एकमेव भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक रमेश विश्वास कुमार अपघातातून बचावले. या अपघातानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घटनास्थळी भेट दिली आणि बचाव कार्यात गुंतलेल्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांनी तपास आणि मदत कार्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. अहमदाबादमधील विमान अपघाताची आठवण करून देताना ते म्हणाले की, तो क्षण अजूनही त्यांच्या डोळ्यांसमोर ताजा आहे. डीडी न्यूजशी बोलताना विश्वास म्हणाले, मला अजूनही विश्वास बसत नाही की मी जिवंत आहे. माझ्या डोळ्यांसमोर सर्व काही घडले. क्षणभर मला वाटले की माझा मृत्यू निश्चित आहे. ते म्हणाले की, विमान उड्डाणानंतर अवघ्या १० सेकंदातच कोसळले. विश्वास म्हणाला, असं वाटत होतं की विमान कुठेतरी अडकलं आहे. मग अचानक लाईट लागले आणि काही क्षणातच विमान वेगाने पुढे सरकलं आणि मग एक जोरदार टक्कर झाली. त्यांच्या मते, सगळं इतक्या वेगाने घडलं की कोणालाही काहीही समजण्याची संधी मिळाली नाही. विश्वास कुमार रमेश म्हणाले की ते विमान ज्या बाजूला पडलं त्या इमारतीऐवजी मोकळ्या मैदानात पडले होते. ते म्हणाले, माझ्या जवळची जमीन पूर्णपणे सपाट होती. दरवाजा तुटताच मला दिसलं की बाहेर पडण्याचा मार्ग आहे आणि मी लगेच तिथून पळून गेलो. विश्वास यांच्या डाव्या हाताला भाजलं होतं, पण ते सुरक्षितपणे बचावले. दुःख व्यक्त करताना ते म्हणाले, विमान ज्या बाजूने इमारतीला धडकले तिथून कोणीही बाहेर पडू शकले नाही. विश्वासचा भाऊ नयन कुमार रमेश म्हणाला की त्याचा भाऊ वाचला हे चमत्कारापेक्षा कमी नाही. त्याने सांगितले की अपघातानंतर काही मिनिटांनीच विश्वासने लेस्टरमध्ये त्याच्या वडिलांना फोन करून सांगितले की तो सुरक्षित आहे. विश्वास कुमार रमेश यांच्या भावाने सांगितले की, विमान कोसळले तेव्हा विश्वास यांनी ताबडतोब त्यांच्या वडिलांना व्हिडिओ कॉल केला आणि म्हणाले, बाबा, विमान कोसळले आहे. माझा भाऊ कुठे आहे हे मला माहित नाही. मला दुसरा कोणताही प्रवासी दिसत नाही. मी कसा वाचलो किंवा विमानातून कसा बाहेर पडू शकलो हे मला समजत नाही.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ भेट : एक प्रेरणादायी अनुभव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दि. ११ जून २०२५ रोजी नांदेड सिटी तील अभ्यासू आणि सामाजिक जाणीव असलेल्या जेष्ठ आणि तरुण १५ अभ्यासकांचे शिष्टमंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षण व विस्तार विभागप्रमुख प्रा. डॉ. गीताताई शिंदे यांची सदिच्छा भेट घेण्यासाठी विद्यापीठात गेलो होते

या भेटीत डॉ. गीता ताई यांनी विभागातील विविध शैक्षणिक उपक्रम, सर्टिफिकेट कोर्सेस, आणि शासनाच्या सहकार्याने राबवता येणाऱ्या सामाजिक प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. विद्यापीठाच्या समाजाभिमुख धोरणानुसार, आजच्या गरजांनुसार रोजगाराभिमुख अल्पकालीन अभ्यासक्रम, विशेष शिबिरे, तसेच जेष्ठ नागरिक, दिव्यांग, अंध आणि विशेष मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली.

विशेषतः दृष्टिहीन असूनही पीएच. डी. केलेल्या प्राध्यापकांनी अंधांसाठी तयार केलेले मोबाईल ॲप आधारित प्रशिक्षण कार्यक्रम, विषेश म्हणजे एका स्वच्छता कर्मचाऱ्याच्या मुलाचा पीएच.डी. होऊन त्याच विभागात कार्यरत असलेला प्रवास - ही उदाहरणे उपस्थितांच्या मनात खोलवर ठसली.

विद्यापीठातील आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालय, तंत्रसुसज्ज सुविधा आणि सुसंस्कृत परिसर पाहून काही ज्येष्ठ सदस्यांनी पुन्हा एकदा विद्यार्थी व्हावेसे वाटते अशी भावना व्यक्त केली. या भेटीत, नांदेड सिटी तील नागरिकांसाठी प्रवेश परीक्षा न लागणारे, समाजाभिमुख अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.

सदस्यांच्या अनुभवातून

सौ. मुग्धा सतीश पाटील : ( शुभकल्याण, नांदेड सिटी ) यांनी आपल्या प्रतिक्रिया अतिशय ओघवत्या शब्दांत व्यक्त केल्या :





११ तारखेला विद्यापीठात जायचे आहे, असे गोरे काकांनी सांगितले आणि प्रत्यक्षात ही भेट आमच्यासाठी पर्वणीच ठरली. मा. गीताताई शिंदे यांचे आदरातिथ्य, वेळ, आणि सखोल माहितीमुळे आम्हा सर्वांच्या ज्ञानात भर पडली. त्यांनी आम्हाला 'तुम्ही नांदेड सिटीमध्ये काय काय करू शकता' याचे स्पष्ट दिशादर्शन केले

त्यांनी सांगितलेले काही उपक्रम आपण नांदेड सिटी मधे करू शकतो:

१ ) मतीमंद मुलांसाठी विविध certified/online courses

२ ) माधुरी देशपांडे यांच्या छत्रछ्ज मार्फत काही उपक्रम राबवण्याची शक्यता

३ ) Special child च्या पालकांसाठी २१ प्रकारच्या विकलांगतेविषयी जागरूकता

४ ) जेष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष - नोंदणी करून परिसंवाद, शिबिरे आयोजिता येणे

५ ) जेष्ठांसाठी स्वतंत्र वाचनालय दालन, शासनाची मदत घेण्याची शक्यता

६ ) wareness programs - Free of cost

७ ) अंध व्यक्तींसाठी उपयुक्त प्रशिक्षण व मदत

८ ) मोबाईल certificate course - ३ महिन्यांत, नाममात्र शुल्कात

९ ) भारतीय संस्कृती संवर्धन - गडकिल्ल्यांना भेटी

१० ) पंचकोश या वेदांमधील विषयाला जागतिक पातळीवर नेण्याचा प्रयत्न

गीताताई म्हणजे आत्मविश्वासपूर्ण देहबोली आणि माहितीचा खजिना आहेत. त्यांचे सहकारी समाधान सर, किरण भिसे सर, सारिका मॅडम, धनंजय सर, गुप्ता सर - सगळ्यांनीच भरपूर माहिती दिली. सर्व प्रयोगशाळा दाखवल्या. विशेषतः लींरपू, ेश्रेसू श्ररल पुन्हा कॉलेजमध्ये आलो आहोत असे वाटले. शेवटी फोटोसेशन करून भारावलेल्या मनाने आम्ही निरोप घेतला

सौ. मुग्धा पाटील यांच्या भावस्पर्शी अभिप्रायानंतर, डॉ. नेत्रा देशपांडे यांनीही या भेटीचा अनुभव एका वेगळ्याच दृष्टिकोनातून मांडला:

विद्यापीठात जायचे आहे, असा गोरे काकांचा मेसेज आला. नेहमीप्रमाणे सगळी माहिती आली आणि त्यातच डॉ. गीता शिंदे यांचा परिचय:. परिचय वाचायला लागल्यावर काय झाले, तर आपल्या आयुष्याच्या, करिअरच्या इवल्याश्या झुडपा समोर एक प्रचंड वटवृक्ष उभा राहिला

अनेक फांद्या, अनेक पारंब्या, असंख्य पान-फुलं-फळं असलेला, प्रचंड व्याप्ती असलेला शिक्षणाचा, समाजकार्याचा, ज्ञानाचा वटवृक्ष.

अर्थातच, देणं हीच ज्यांची प्रवृत्ती, अशा गीता ताईंकडून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. त्यातील काही ठळक बाबी: १ ) शिक्षणाचा णठ किती प्रभावी असतो आणि व्यक्तीला ींरपवीीं षीा ींहश लीव बनवतो.

२ ) हेच शिक्षण जर समाजाभिमुख आणि तळागाळात पोहोचविण्याची इच्छा असेल, तर ते शिक्षण खऱ्या अर्थाने साकारते.

३ ) एक भारतीय स्त्री म्हणून त्यांच्या आजूबाजूला असंख्य जबाबदाऱ्या, अडचणी, कुटुंब, प्रश्न असले तरी त्या सगळ्यातून त्या डॉ. गीता शिंदे बनल्या

या शिष्टमंडळात नांदेड सिटी जेष्ठ संचालक ड. नरसिंह लगड, श्री प्रकाश गोरे, भारतीय स्त्री शक्ती नांदेड सिटी सेंटरच्या सौ. अर्चनाताई अशोक कौलगुड, नांदेड सिटी सेवा प्रमुख श्री मिलिंद दिक्षित, श्री मंगेश भागवत, चि. आर्य लगड, सरगम सखी संस्था सौ. गौतमी कुलकर्णी, सौ. मुग्धा पाटील, सौ. अनुजा बेंडखळे, पुणे केम्ब्रिज शाळेच्या विश्वस्त सौ. मोनाली शहा, डॉ. नेत्रा देशपांडे, कु. रागिणी लगड, कु. सिद्धी दिलीप लगड, कु. ज्ञानेश्वरी शंकरराव इंगवले, डॉ. प्रेरणा डोंगरे आणि अनुलोम संस्थेच्या सौ. नयना चव्हाण-पाटील सहभागी झाले होते.

ही भेट केवळ एक औपचारिक भेट नव्हती, तर समाजासाठी काहीतरी सकारात्मक घडवण्याची प्रेरणा ठरली. या सु_संवादातून पुढील अनेक उपक्रमांना चालना मिळेल, असा विश्वास वाटतो. या अविस्मरणीय अनुभवाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मा. प्रकाश गोरे काका, डॉ. गीता ताई शिंदे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार!

**( वृत्त संकलन - सौ गौतमी कुलकर्णी, सरगम )**

# गावगाथा दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : ग्रामीण जीवनाचे विविध पैलू, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक जडणघडण उलगडणारा लोकप्रिय दिवाळी अंक गावगाथा यंदा आपल्या चौथ्या वर्षात पदार्पण करत आहे. यानिमित्ताने गावगाथा - २०२५ या विशेष दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही हा अंक दर्जेदार, वाचनीय आणि आकर्षक स्वरूपात प्रकाशित करण्यात येणार असून ग्रामीण जीवनाला स्पर्श करणारे लेख, ललित लेखन, कविता, अनुभव, प्रवासवर्णने, ग्रामीण शौर्यकथा, सामाजिक प्रश्नांवरील चिंतनपर लेख, मुलाखती, व्यक्तिचित्रणे, कथा, लघुकथा, वेशभूषा-व्यवहार, लोककला, ग्रामीण भाषाशैली अशा विविध साहित्य प्रकारांना अंकात प्राधान्य दिले जाणार आहे.

हा दिवाळी अंक नवोदित व मान्यवर लेखकांसाठी उत्तम व्यासपीठ ठरणार आहे. ग्रामीण मातीतून आलेल्या साहित्यिकांचे विचार, शब्द आणि भावभावना गावगाथाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचणार आहेत.

संगणकावर टाईप केलेले साहित्य (मराठी युनिकोड फॉन्टमध्ये) ई-मेलने पाठवावे. साहित्याबरोबर लेखकाचे संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक आणि छायाचित्र पाठवावे.

साहित्य पाठविण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५

संपर्क: धोंडपा नंदे - संपादक, गावगाथा दिवाळी अंक मो. ९८५०६१९७२४

ई-मेल: gavgatha@gmail.com

साहित्यप्रेमी, ग्रामीण भागातील लेखक, अभ्यासक, शिक्षक, विद्यार्थी यांनी या संधीचा लाभ घ्यावा व गावगाथा - २०२५ अंकात आपल्या लेखणीद्वारे योगदान द्यावे, असे आवाहन संपादक धोंडपा नंदे यांनी केले आहे.

# श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चंदनउटी पुजेची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : ग्रीष्मऋतूतील वाढत्या उन्हापासून श्रीविठुरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून पासून सुरुवात करण्यात आली होती व आज दि.१३ जून रोजी सांगता पुजा मंदिर समितीचे सदस्य व अधिकारी यांच्या शुभहस्ते करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.





श्रीविठ्ठलाला उन्हाचा त्रास होऊ नये, त्याची तीव्रता कमी व्हावी, थंडावा मिळावा या भावनेतून ही पूजा केली जाते. विठुरायाप्रमाणे रुक्मिणी मातेला देखील यापद्धतीने चंदन उटी लावण्यात येते. या चंदनउटी पुजेची आज दि. १३ जून रोजी सांगता पुजा झाली. त्यामध्ये श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची चंदनउटी पुजा अनुक्रमे सदस्या ड माधवीताई निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर) व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या शुभहस्ते संपन्न झाली. यावेळी सदस्या शकुंतला नडगिरे, विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे, सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व पांडूरंग दशपुत्रे उपस्थित होते. यंदा प्रथमच, भाविकांना श्रींची चंदनउटी पुजा ऑनलाईन पध्दतीने बुकींग करण्यास उपलब्ध करून दिली होती. त्यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या पूजेच्या माध्यमांतून मंदिर समितीला सुमारे ३५ लक्ष १३ हजार इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. त्यामध्ये श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेकडे अनुक्रमे रूपये २१,००० व ९,००० इतके देणगी मुल्य होते. दि.३० मार्च ते १३ जून कालावधीत एकूण पुजेचे ७६ दिवस उपलब्ध झाले होते. त्यामध्ये श्री विठ्ठलाकडे १२१ व रूक्मिणीमातेकडे १०८ पुजा उपलब्ध झाल्या होत्या. यापूजेसाठी अंदाजे ९० ते ९५ किलो चंदनाचा वापर करण्यात आला आहे. याशिवाय, चंदनउटीपुजेच्या सांगतानिमित्त श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये विशेष भोजन व्यवस्था करण्यात आली होती. त्यामध्ये सुमारे २००० ते २५०० भाविकांना लाभ घेतला.

**मंदिर समितीला या पूजेपासून ३५ लक्ष रूपयाचे उत्पन्न**

# पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची मोठी कारवाई जबरी चोरी करणारे तीन आरोपी गजाआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे रोपळे या गावाचे शिवारातील हॉटेल शिवशंभूमध्ये दिनांक०७/०६/२०२५ रोजी रात्री०१;०० च्या सुमारास येथील फिर्यादी श्री उत्तम बाजीराव गोडगे राहणार माढा तालुका माढा व त्यांची मित्र श्री धुमाळ हे गावाकडे जाण्यासाठी वाहनाची वाट बघत थांबले असता त्या ठिकाणी तीन आज्ञा तीसमान येऊन लोखंडी रोड व लाकडी दांडक्याच्या साह्याने फिर्यादी उत्तम गोडगे व धुमाळ यांना डोक्यात व पाठीत मारहाण करून जबर दुखापत करून जबरी चोरी केली होती त्यानंतर दिनांक०८/०६/२०२५ रोजी मौजे रोपळी तालुका पंढरपूर आष्टी रोडवर रात्री वाजण्याच्या सुमारास फिर्यादी भैरवनाथ संजय नाडकर राहणार मोशी तालुका माढा हे रोडने जात असताना त्यांना चार अनोळखी स्मणी रस्त्यामध्ये अडवून मारहाण करून जबर दुखापत करून त्यांच्या ताब्यातील मोटरसायकल किंमत रुपये ७५ हजार रुपये ची मोटरसायकल जबरदस्ती चोरून नेऊन गेले. सदर दोन्ही घटनेबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे ४८९ /२५ व ४९१/२५इछड कलम ३०९ वगैरे प्रमाणे दोन्ही घटनेच्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल होती. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने माहिती मिळताच पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर यांनी तपासाची वेगवेगळी तपास पद्धती तयार करून फिर्यादीने सांगितलेल्या आरोपीच्या वर्णनावरून गुन्हेतील आरोपींचा मौजे आष्टी तालुका मोहोळ या भागात शोध घेऊन सदर होण्याचे तपासकामी एकूण तीन आरोपींना ए १)तुषार सुनील कोळेकर वय २३ वर्षे राहणार पंढरपूर सध्या आष्टी मोहोळ२) सुरज देशमुख राहणार मोहोळ३) राहुल फाळके राहणार मोहोळ असे तीन



आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे विचारपूस केले असता सुरुवातीला आरोपीने उडवाळूची उत्तरे दिली त्यानंतर आरोपीकडे सखोल तपास केला असता आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिलेली असून आरोपींनी गुण्या चोरलेली रक्कम व मोटरसायकल किंमत रुपये ७५००० असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे एकूण तीन आरोपींना अटकेची कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर साहेब, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अर्जुन भोसले साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनची वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्वास पाटील, वसई कवितकर सहाय्यक फौजदार दत्तात्रय तोंडले, विजयकुमार गायकवाड पोलीस स्वप्निल वाडदेकर ,पोलीस हवालदार सज्जन भोसले , पोलीस हवालदार इरफान शेख, पोलीस कॉन्स्टेबल गोंगाने पोली कॉन्स्टेबल संतोष चव्हाण विजयकुमार आवटी , सूर्य पो नदाफ ,यांच्या पथकाने कामगिरी केली आहे

# पंढरपूर येथे सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत उपविभाग पंढरपूर येथे बिपिन परचडराव यांची एसडीसी पदी नियुक्ती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर अंतर्गत उपविभाग पंढरपूर येथे एस सी डी पदी बिपिन परचंडा राव यांनी आपल्या कार्याचा नुकताच पदभार स्वीकारला आहे श्री बिपिन प्रचंड राव हे यापूर्वी करकम येथे कार्यरत होते करकम येथे उपविभागीय कार्यालयात अतिशय चांगली काम उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे पंढरपूर उपविभागी येते त्यांची नियुक्ती झाल्यामुळे त्यांचे विशेष अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी उपस्थित हनुमंत गायकवाड रावसाहेब, दीपक कुलकर्णी रावसाहेब, किशोर डिगोळ रावसाहेब, विक्रांत पाटील रावसाहेब, उत्कर्ष देशमुख रावसाहेब, आदी जण उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र घोषित

## चौफाळा ते मंदिर, महाद्वार चौक परीसर वाहनांना बंदी; जिल्हाधिकारी यांचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. आषाढी यात्रा सोहळयासाठी अंदाजे ८ ते १० लाख भाविक पंढरपूरला येतात. यात्रेच्या कालावधीमध्ये भाविक मोठ्या प्रमाणात्त पंढरपूरला येत असतात. पंढरपूर शहरात येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता, श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदीर परीसर, पुढे महाद्वार चौक परीसर या भागात भाविकांची संख्या मोठया प्रमाणात असते. या भाविकांना पार्किंग केलेल्या वाहनांची अडचण येते. तसेच वाहतूक कोंडी होऊन अपघात होणेचाही धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मंदिर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे.



पंढरपूरात आलेले भाविक दर्शनरांगेकडे व मंदिराकडे पायी चालत जात असतात. अशा-वेळी बर्याच ठिकाणी प्रदक्षिणा मार्गावर तसेच जागोजागी दुचाकी, चारचाकी वाहने पार्किंग केलेले असतात. तसेच दर्शनासाठी किंवा अन्य कामासाठी वाहनांची अनावश्यक वर्दळ असते. तसेच पायी जाणारे भाविकांमधून वाहनांची ये-जा होत असते. त्यामुळे रस्ता अरूंद होवून भाविकांना रस्त्यावरून ये-जा करण्यास अडचण निर्माण होते. या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन अपघात होण्याचाही धोका निर्माण होऊ शकतो. हे टाळण्यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी वाहन प्रतिबंधक आदेश पारीत केले आहेत. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ (ब) नुसार पंढरपूर शहरातील श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदीर परीसर ते पुढे महाद्वार चौक परीसर हा परीसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषीत करीत आहे. सदरचा आदेश दिनांक १३ जून ते २५ जून या कालावधीत सकाळी ५ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत व दि. २६ ते १० जुलै कालावधीत २४ तास या वेळेकरीता लागू राहणार आहे.

या आदेशानुसार - श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिम द्वार, मंदीर परीसर पुढे महाद्वारचौक परीसर दुचाकी चारचाकी व इतर सर्व वाहने चालवण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच वाहने पार्कीग करता येणार नाहीत. तसेच मंदीर परीसरातील छोटया छोटया अरूंद रस्त्यावर वाहने लावता येणार नाहीत.

**या वाहनास सूट देण्यात आली आहे-**

शासकीय सेवा, अत्यावश्यक सेवा, मंदीर परीसरात राहणारे, मंदीरात कामकाज करणारे व्यक्तींचे वाहनांसाठी पोलीस प्रशासनाकडून पास प्राप्त झालेनंतर सदरच्या आदेशातून सूट राहील.

वाहनाची पाकींग व्यवस्था पंढरपूर नगर परीषदेमार्फत करण्यात यावी. नगर परीषदेने बॅरीकेड्स लावावेत. मंदीर परिसरात राहणारे, कामकाज करणारे व्यक्तींकरीता नमुद कालावधीसाठी पास देणेची व्यवस्था पोलीस प्रशासनाने करावी. मंदीर परिसरातील व्यावसायिकांनी मालाची ने-आण करणेकामी पोलीस प्रशासनाशी चर्चा करुन ठराविक वेळ निश्चीत करुन वाहतूक करण्याची खबरदारी घ्यावी.

> श्री विठ्ठल मंदिराकडे जाण्यासाठी वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. महत्वाचे तसेच राजशिष्टाचार पात्र व्यक्तीसाठी तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी श्री विठ्ठल रुक्मीणी मंदीरे समीतीने श्रीकृष्ण मंदीर, चौफाळयापासून ने-आण करण्यासाठी पर्यावरणपूरक वाहनांची व्यवस्था करावी. या व्यतिरिक्त वाहने शिवाजी चौकात पार्कींग करावीत. पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांनी या आदेशाची अंमलबजावणी कोटेकोरपणे करावी. तसेच आदेशाचा भंग करणर्यांविरोधात वाहन जप्तीची कारवाई करावी. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास उल्लंघन करणर्या विरुध्द राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ अन्वये कारवाईस पात्र राहिल.
>
> **-जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद**

# शाश्वत शेतीसाठी बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी अमर जाधव : दावतपूर (ता. औसा, जि. लातूर) येथे एडीएम ॲग्रो इंडस्ट्रीज, लातूर व रोबेल शेतकरी उत्पादक कंपनी, वाघोली पाटी यांच्या संयुक्त विद्यमाने शाश्वत शेती उपक्रम २०२५-२६ अंतर्गत बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक व मार्गदर्शन कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दावतपुर ग्राम पंचायतीचे सरपंच. श्री. शिवदास कांबळे होते तसेच उपसरपंच. श्री विठ्ठल बेडजवळगे व कृषी सहाय्यक. फावडे उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून एडीएम ॲग्रोचे श्री. महादेव पवार आणि रोबेल चे अतिक सय्यद हे उपस्थित होते .

कार्यक्रमात श्री. महादेव पवार यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पिकावरील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी बीज प्रक्रिया कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखवले. बीज प्रक्रिया केल्याने पीक उत्तम उगम घेते, रोगप्रतिकारकता वाढते व उत्पादनात वाढ होते या विषयी सविस्तर मारगदर्शन केले. श्री. कृषि सहाय्यक फावडे साहेब यांनी सोयाबिन बियाणे वान व उगवण क्षमता यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात उप सरपंच श्री. विठ्ठल बेडजवळगे यांनी वृक्ष लागवड व बि बी एफ यंत्राने पेरणी करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात गावातील प्रगतशील व शाश्वत शेती करणारे शेतकरी मोठया संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी एडीएम ॲग्रोकडून श्री. किशोर मोरे यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी रोबेल ॲग्रोचे श्री. अतीक सय्यद यांनी आभार व्यक्त केले.



# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या जिल्हाध्यक्षपदी वसंतराव देशमुख



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका थोड्याच दिवसात होऊ घातल्या आहेत. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष पद पंढरपूर तालुक्याचे ज्येष्ठ नेते श्री वसंत नाना देशमुख यांच्याकडे सोलापूर जिल्ह्याचे अध्यक्ष पद देण्यात आले आहे. सोलापूर जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला ओळखला जात होता.

सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंतर्गत मतभेदामुळे काँग्रेसला मोठा फटका बसला आहे पुन्हा सोलापूर जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ताकद वाढवण्यासाठी शरच्चंद्र पवार यांनी लक्ष केंद्रित केले आहे. लोकसभा निवडणुकीत माढा व सोलापूर खासदार महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी केले.

शरद पवार यांना मानणारा सोलापूर जिल्ह्यामध्ये मोठा गट आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सोलापूर जिल्ह्यात सत्ता मिळवण्यासाठी शरद पवार यांनी लक्ष केंद्रित केले आहे. सोलापूर जिल्हा अध्यक्ष बळीराम काका साठे यांच्याकडून पदभार काढून घेऊन पंढरपूर तालुक्यातील ज्येष्ठ नेते वसंतराव देशमुख यांच्याकडे जिल्हाध्यक्ष पदाचे जबाबदारी देण्यात आली आहे. वसंतराव देशमुख यांना राजकारणाचा मोठा अनुभव आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, स्वर्गीय माजी आमदार सुधाकरपंत परिचारक यांच्याबरोबर त्यांनी काम केले आहे. त्यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती कृषी उत्पन्न बाजार समिती व पांडुरंग सहकारी साखर कारखाने व्हाईट चेअरमन अनेक पदे भूषवलेले आहेत . त्यामुळे त्यांना कामाचा चांगला अनुभव आहे . म्हणून खासदार शरद पवार यांनी वसंतराव देशमुख यांचे सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी निवड केली आहे.

या निवडीचे पत्र माझी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते वसंतराव देशमुख यांना देण्यात आले आहे. देशमुख यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सोलापूर जिल्ह्यामध्ये त्यांचे सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन व स्वागत केले जात आहे .

# स्व.महादेवराव आवताडे प्रतिष्ठानच्या वतीने आज पंढरपूर व मंगळवेढा येथे गुणवंतांचा सन्मान सोहळा

### प्रसिद्ध व्याख्याते यशवंत गोसावी यांची विशेष उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : स्व.महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या वतीने इयत्ता १० वी व १२ वी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील गुणवंतांचा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या शुभहस्ते व युटोपियन शुगर चे चेअरमन उमेश परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली आज शनिवार दिनांक १४ जून २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता जोगेश्वरी मंगल कार्यालय मंगळवेढा-पंढरपूर बायपास रोड, मंगळवेढा येथे व दुपारी १. ३० वाजता श्रीयश पॅलेस कराड रोड पंढरपूर येथे सन्मान सोहळा व मार्गदर्शन शिबीर कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे संचालक पै दादासाहेब ओमणे यांनी दिली आहे.

सदर कार्यक्रमासाठी नामांकित वक्ते व सुप्रसिद्ध व्याख्याते यशवंत गोसावी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून उपस्थित गुणवंत विद्यार्थ्यांना आणि पालकांना मार्गदर्शन करणार आहेत. व्याख्याते यशवंत गोसावी यांनी आत्तापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचार संस्कारातून समाजशील आणि विवेकशील युवा पिढीच्या निर्मितीसाठी आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून समग्र महाराष्ट्रभर प्रबोधनाची आणि परिवर्तनाची मोठी क्रांतिकारक चळवळ निर्माण केली आहे.



त्याचबरोबर या कार्यक्रमासाठी प्रांताधिकारी बी आर माळी, पोलीस उपविभागीय अधिकारी विक्रांत गायकवाड, शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग सचिन जगताप, शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग कादर शेख, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे तहसीलदार मदन जाधव, मुख्याधिकारी चरण कोल्हे, गटविकास अधिकारी योगेश कदम, गटशिक्षणाधिकारी दर्शन मेहता यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मतदारसंघातील सामाजिक, सांप्रदायिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून या प्रतिष्ठानने अनेक कार्यक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानच्या वतीने स्कूल बॅग, प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी अशा स्वरूपामध्ये सन्मानित केले जाणार आहे.

तरी वरील मंगळवेढा कार्यक्रमासाठी तालुक्यातील सर्वच शाळा कॉलेजचे संस्था पदाधिकारी, प्राचार्य मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, गुणवंत विद्यार्थ्यांनी व पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन स्व.महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

**२ लाख १८ हजार रुपयाचा वाहनासह दारूचा मुद्देमाल जप्त**

# विदेशी दारूची अवैध विक्री व्यवसाय करण्यासाठी वाहतूक करणाऱ्या २ व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी अमर जाधव

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की, पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्याकरिता जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात किल्लारी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ.विशाल शहाणे यांच्या नेतृत्वातील पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर किल्लारी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निलंगा ते लामजना जाणारे रोडवर सापळा लावून देशी विदेशी दारूची चोरटी विक्री व्यवसाय करण्यासाठी अवैध वाहतूक करीत असलेल्या वाहनाला दारूच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. दारूची अवैध वाहतूक करणाऱ्या दोन इसमा विरुद्ध पोलीस ठाणे किल्लारी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दिनांक ११/०६/२०२५ रोजी किल्लारी परिसरातून हुंडाई सेंट्रो कंपनीची कार क्रमांक एम.एच. १२ डी.एम.७६६० या वाहनातून वीदेशी दारूची अवैध वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती वरून किल्लारी पोलीस ठाण्याने बेकायेशीररित्या अवैधपणे विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या वाहनाला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्यामध्ये वेगवेगळ्या नावाची १८ हजार ४८० रुपयाची विदेशी दारू व दोन लाख रुपये किमतीची सेंट्रो कार मिळून आली. देशी दारूची अवैध वाहतूक करीत असलेल्या दोन इसम नामे

### किल्लारी पोलीस ठाण्याची कारवाई

१) गजानन बाबुराव बिराजदार, वय ३८ वर्ष, राहणार लामजना तालुका औसा जिल्हा लातूर.

२) सत्यवान चंद्रभान सूर्यवंशी, वय ४० वर्ष राहणार, मुगळेवाडी तालुका औसा जिल्हा लातूर. यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलिस अधिकारी औसा कुमार चौधरी यांचे मार्गदर्शनात किल्लारी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ.विशाल शहाणे यांचे नेतृत्वातील पथकामधील पोलीस अंमलदार दत्तात्रय जाधव, गायकवाड यांनी केली आहे.

**पंढरपूर तालुका पोलीस व महसूलची संयुक्त कारवाई**

# चिंचोली भोसे येथे वाळू तस्करांच्या जाळल्या होड्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलीस महसूल विभाग यांच्या संयुक्त पथकाने धडाकेबाज कारवाई केली आहे चिंचोली भोसे येथील नदीकाठच्या वाळू तस्करांच्या होड्या जाळून त्यांना मोठी जरा बसून वाळू तस्करांची कोंडी केली आहे.

येथील उपविभागीय अधिकारी सचिन इथापे उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले व तहसीलदार सचिन लंगोटे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार दिनांक १० जून रोजी मौजे चिंचोली भोसे या ठिकाणी पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन व येथील महसूल विभागाच्या संयुक्त कारवाईत भीमा नदीपत्रातील बोटी चाळून कापून त्या नष्ट केले आहेत.



मागील काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात वाळू तस्करांचा मोठा धुमाकूळ चालू आहे. माजवून भीमा नदीचे पात्र पोखरले आहे भीमा नदी पात्रात मोठ-मोठे खड्डे एका महिन्यात पडल्याने चारच भाविकांचा मृत्यू झालेला आहे.

वाळू माफिया गाबरगंड झाल्याने कुणाला जुमानत नाही अनेक वेळा शासकीय अधिकाऱ्यांच्या अंगावर पाणी घालण्याचा प्रकारे घडलेला आहे. ह्या मोठा कारवाईमुळे वाळू तस्करावर मोठी जरा बसली आहे तालुका पोलीस व प्रशासनाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली आहे.

सदर कारवाई तालुका पोलीस महसूल प्रशासन यांच्या वतीने कायमस्वरूपाची चालू ठेवणे अशी नागरिकांतून मागणी होत आहे.

# वारकऱ्यांची आरोग्य सेवा हीच पांडुरंगाची सेवा असून प्रत्येकाने आपले कर्तव्य पार पाडावे

## सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर; पालखी सोहळ्यानंतही संबंधीत ठिकाणची स्वच्छता, फवारणी व आरोग्य सुविधा देण्यात येणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी व जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक सहभागी होतात. सर्व वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा तसेच पालखी तळांवर आवश्यक आरोग्य सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे. वारकऱ्यांची आरोग्य सेवा करणे ही मोठी भाग्याची गोष्ट असून हीच पांडुरंगाची सेवा आहे. तरी प्रत्येकानेच सर्वश्रेष्ठ सेवाभावाच्या भावनेने कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश यांनी केले.




आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधेबाबतच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवार, अति संचालक डॉ. संदीप सांगळे, आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकिशन पवार, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके आदी उपस्थित होते.

यावेळी आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले, प्रत्येक वारीत आरोग्य विभागाने चांगले केले आहे. या वारीतही आरोग्य विभागाने सूक्ष्म नियोजन करुन वारकरी भाविकांना अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध कराव्यात यामध्ये कोणतेही त्रुटी राहू नये यांची दक्षता घ्यावी.साथरोग नियंत्रणाच्या दृष्टीने पालखी सर्व मार्गावरील पाणी स्त्रोतांचे सर्वेक्षण तसेच पाणी नमुने तपासणी करावी. तसेच पालखी मार्गावरी संबधित गावातून पालखी सोहळे मार्गस्थ झाल्यानंतर त्या ठिकाणची स्वच्छता करुन तात्काळ औषध फवारणी करावी. तसेच तेथील स्थानिक नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. महिला वारकऱ्यांसाठी स्त्रीरोगतज्ञाच्या माध्यमातून विशेष तपासणीचे नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. पालखी मार्गावरील पुरेशा औषधसाठा व तज्ञ व प्रशिक्षित मनुष्यबळ यांची उपलब्धता ठेवावी. पालखी सोहळ्यासोबत राज्याच्या कानाकोपऱ्यातून वारकरी भाविक येतात यासाठी आरोग्य विभागाच्या विविध कल्याणकारी योजना, सुविधा आदीबाबतचा प्रचार-प्रसिध्दी करण्यात यावी. जेणेकरुन आरोग्य विभागाच्या विविध आरोग्य कार्यक्रमांची माहिती सर्व वारकऱ्यांपर्यत पोहोचविण्यात मदत होईल, असेही आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी सांगितले. तसेच पंढरपूर शहर त्याचबरोबर पालखी मार्गावरील खाजगी दवाखान्यात महात्मा ज्योतीराव फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत असणाऱ्या रुग्णालयांना १० टक्के खाटा आरक्षित करण्यात येणार असून, ट्रॉमा आय.सी.यू. सेंटरच्या ठिकाणी तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पालखी मार्गावर वैदयकीय पथके, आवश्यक उपकरणे व औषधांसह सुसज्ज ३३१ रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार आहेत. ४६ ठिकाणी १० खाटांचे तात्पुरते आय.सी.यू. कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. दिंडया सोबत पालखी मार्गावर २९० आरोग्यदुत बाईक ॲम्ब्युलन्स व्दारे आरोग्य सेवा देणार आहेत. त्याचबरोबर वारकरी भाविकांना औषधी किट आरोग्य विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात असल्याची माहितीही यावेळी आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिली.

यावेळी आमदार आवताडे म्हणाले, आतापर्यंत वारी कालावधीत आरोग्य विभागाने चांगल्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्याचे सांगून, पालखी मार्गावर तसेच पंढरपूर शहरात आपला दवाखाना, ट्रामा केअर सेंटर , उपलब्ध आरोग्य सुविधा याबाबत ठळक फलक लावावेत जेणे भाविकांना आरोग्य सुविधेचा लाभ घेता येईल. तसेच वारी संपल्यानंतर स्थानिक नागरिक आजारी पडण्याची शक्यता लक्षात घेवून वारी नंतरही आरोग्य सुविधा उपलब्ध ठेवाव्यात असे सांगितले. आमदार राजू खरे म्हणाले, आषाढी यात्रा कालावधीत येणाऱ्या प्रत्येक वारकरी भाविकाला दर्जेदार सुविधा मिळावी, यासाठी मुबलक औषधसाठा, तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता ठेवावी.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम म्हणाले,पावसाचे वातावरण लक्षात घेवून, पालखी मार्गावरील सर्वच ठिकाणच्या पाणी स्तोत्राचे नमुने तपासणी सुरु आहे. टँकर भरण्याचे ठिकाणी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन सदर ठिकाणचे पाणी पिण्यास योग्य असल्याबातचे माहिती देण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी आरोग्य विभागाच्या वतीने केलेल्या तयारीबाबतचे सादरीकरण आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी केले. यामध्ये पालखी मार्गावर प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावरती २०३ आपला दवखाना स्थापन करण्यात आले आहेत. पालखी मार्गावरील सर्व आरोग्य संस्थामध्ये पुरेशा औषधसाठा व तज्ञ व प्रशिक्षित मनुष्यबळ यांची उपलब्धता असणार आहेत असे सांगितले.

### वाखरी पालखी तळाची आरोग्यमंत्र्यांनी केली पाहणी

आषाढी यात्रेनिमित्त पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या वारकरी, भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. त्या पार्श्वभूमिवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी वाखरी पालखी तळची पाहणी करून प्रशासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत माहिती घेघेवून आवश्यक सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी त्यांच्या समवेत संचालक डॉ. विजय कंदेवार, आरोग्य उपसंचालक डॉ.राधाकिशन पवार,जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके उपस्थित होते.

---

# पुरंदर मध्ये रविवारी रिपब्लिकन पक्षाच्या मेळाव्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : रविवार दि. १५ / ६ / २०२५ रोजी सकाळी ठीक ११-०० वाजता पुरंदर तालुक्यातील सासवड येथे जेजुरी सासवड रोड गावकरी हॉटेल वीर फाट्याजवळ सासवड येथे रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, या मेळाव्यास लोकनेते रामदास आठवले यांच्या विचार धारेवर काम करणाऱ्या पुरंदर तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे यांनी केले आहे.



या मेळाव्याचे उद्धाटन पश्चिम महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष अशोकबापू गायकवाड हे करणार असून, पुणे जिल्हा रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत कदम हे अध्यक्षस्थान भुषविणार आहेत, तरं विशेष उपस्थितीमध्ये पुणे कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष व रिपब्लिकन पक्षाचे जेष्ठ नेते रोहीदासबापू गायकवाड हे उपस्थित राहणार आहेत, प्रमुख उपस्थिती मध्ये रिपब्लिकन पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश महिला आघाडीच्या वरिष्ठ उपाध्यक्षा संगिताताई आठवले, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, रिपब्लिकन पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष पंढरीनाथ जाधव रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश संघटक सचिव गोविंद जगताप हे उपस्थित राहणार आहेत,

या मेळाव्यात पक्ष बांधणी, तालुका कार्यकारिणी विस्तार , जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी निश्चित करणे, गाव तिथे रिपब्लिकन पक्षाची शाखा स्थापन करणे, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीबाबत धोरण ठरविणे, आदी विषया बाबत मेळाव्याचे नियोजन करण्यात आले, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्राचे पारधी आघाडीचे अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, रिपब्लिकन पक्षाचे तालुका युवक आघाडीचे अध्यक्ष स्वप्निल पाटोळे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे जेजुरी शहर अध्यक्ष रंजित भालेराव रिपब्लिकन पक्षाचे तालुका उपाध्यक्ष सचिन कांबळे, रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे तालुका कार्याध्यक्ष सुधीर शेलार हे कार्यक्रमाचे निमंत्रक आहेत, तर पुरंदर तालुका रिपब्लिकन पक्षाचे तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले आहे, तरी मोठ्या संख्येने रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे यांनी केले आहे,

# बहुजनांना आपल्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही : गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : बहुजन समाजात पिडीजात कोणी गर्भ श्रीमंत बागायत जमिनदार नाही किंवा राजकीय नेतृत्व नाही त्यामुळे बहुजन मागासवर्गीय समाजातील विद्यार्थ्यांना आपल्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणा शिवाय दुसरा पर्याय नाही तेंव्हा महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण पुर्ण करून स्वतःची पर्यायाने समाजाची सर्वांगिनण प्रगती साधण्याचा प्रयत्न करावा असे असे आवहान रिपाइ (आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यानी वागदरी ता.तुळजापूर येथे बोलताना केले.

भिमनगर वागदरी येथील पंचशिल बुध्द विहार समाज मंदिरात समस्त बौध्द वांधवाच्या वतीने येथील इ.१ वी व १२ वी उत्तिर्ण विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी एस.के. गायकवाड बोलत होते.



प्रारंभी महिला कार्यकर्त्या सुगंधा सहदेव वाघमारे,माजी सरपंच तथा डॉ. आबेडकर जयंती उत्सव कमिटी चे अध्यक्ष नागनाथ बनसोडे, श्रामनेर चंद्रकात वाघमारे आदिंच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुध्द व महामानव डॉ.बाबासाहेब आबेडकर यांच्या प्रतिमांचे पुजन करून सामुदायिकरित्या बुध्द वंदना घेऊन इ. १० वी व इ.१२ वी उत्तिर्ण विद्यार्थ्यांचा शालेय साहित्य देवून पेढा भरवून यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी सुर्यकांत वाघमारे,भारत वाघमारे,उज्वला वाघमारे,वंदना वाघमारे श्रीदेवी वाघमारे, स्वाती गायकवाड, कोमल झेंडारे,गेदाबाई बनसोडे, सुष्मा वाघमारे,बाई वाघमारे, शकुंतला वाघमारे,इंदुबाई वाघमारे सह ग्रामस्त महिला विद्यार्थी मोठय संख्येने उपस्थित होते.



# आमणे येथील पुलावर संरक्षित कठडा बसवण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे /प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील महत्त्वाच्या असलेल्या पडघा कल्याण रस्त्यावरील एका पुलावर संरक्षित कठडा नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

पडघा कल्याण रस्त्यालगत असलेल्या तळवली, सापे, वाशेरे, सावद, बापंगाव येथे गोदामांची संख्येत वाढ झाल्याने व या ठिकाणी विवीध उद्योगधंदे वाढल्याने पडघा कल्याण रस्त्यावर खाजगी प्रवाशी चारचाकी, मालवाहतूक वाहने, दुचाकी, एसटी बसेस यांची रात्रंदिवस वर्दळ असते मात्र पडघा कल्याण रस्त्यावरील वाशेरे व आमणे गावाच्या मध्यभागी असलेल्या एका ओहळावरील असलेल्या पुलावर संरक्षित कठडा नसल्याने वाहने पुलाखाली पडुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तर संरक्षित कठडा नसल्याने वाहने पुलाखाली पडुन अपघाताच्या घटना घडुन वाहनचालकांना जिव गमवावा लागल्याचे स्थानीक नागरीकांनी सांगितले. त्यामुळे या पुलावर संरक्षित लोखंडी कठडा बसवण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

---

**पत्रकारांच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष; आता आंदोलनाशिवाय पर्याय नाही**

**व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे**

# वरिष्ठ पत्रकारांसाठी ५०० कोटींची तरतूद करा; ११ हजार पत्रकार वाट पाहतायत, निधी आहे पण सन्मान नाही



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे :

राज्य शासनाने पत्रकारांसाठी सुरू केलेल्या सन्मान व कल्याण योजनांकडे गंभीरतेने लक्ष देण्याऐवजी हलगर्जीपणा केला जात आहे. निधी असूनही निर्णय होत नाहीत, योजना वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. सध्या ११ हजारांहून अधिक पात्र वरिष्ठ पत्रकार आपल्या सन्मानाची वाट पाहत आहेत. अशा परिस्थितीत आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही, असा ठाम इशारा व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी आज सरकारला दिला.

आज माहिती महासंचालनालयात झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत पत्रकारांच्या हक्क आणि सन्मान विषयक विविध मुद्द्यांवर श्री. संदीप काळे यांनी ठोस स्वरूपात भूमिका मांडली. पत्रकारांच्या सन्मानासाठी स्वतंत्र आर्थिक लेखाशीर्ष तयार करावे, तसेच आरोग्यविषयक योजना ट्रस्टच्या माध्यमातूनच चालवाव्यात, अशी स्पष्ट शिफारस त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना केली.

सध्या सरकारकडे पत्रकार सन्मान योजनांसाठी १२० कोटी रुपयांचा निधी जमा असूनही, योजनेच्या प्रभावी आणि नियमित अंमलबजावणीसाठी ५०० कोटी रुपयांची निश्चित तरतूद करणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष आवश्यक असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. निधी असूनही जर योजनांचा लाभ पत्रकारांपर्यंत पोहोचत नसेल, तर हा अन्याय आहे, असे मतही त्यांनी मांडले.

राज्यभरातील अडीच हजारांहून अधिक वरिष्ठ पत्रकारांपर्यंत सन्मान योजना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या सुधारणा त्यांनी सविस्तरपणे मांडल्या. सन्मानासाठी पात्रतेची अट ३० वर्षांऐवजी २० वर्षांची पत्रकारिता करावी, सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० ऐवजी ५८ वर्षे करावी, निष्कलंक सेवा बजावलेल्या पत्रकारांसाठी स्वतंत्र समिती स्थापन करावी, आणि जनसंपर्क विभागाकडे वरिष्ठ पत्रकारांची अद्ययावत नोंद उपलब्ध करून द्यावी, या सर्व मागण्यांवर भर दिला.

सध्या ४०१७ वरिष्ठ पत्रकारांची अधिकृत नोंद असून, त्यांना सन्मान दिल्यास सरकारवर केवळ ६.२८ कोटी रुपये खर्च येतो. दरवर्षी फक्त ४० लाख रुपयांची तरतूद पुरेशी ठरेल – ही रक्कम शासनाच्या दृष्टीने अत्यंत तुच्छ आहे. त्याशिवाय मध्यप्रदेशात ८५०० पत्रकारांना दरवर्षी २० हजार रुपये मानधन दिले जाते, हे उदाहरण देत महाराष्ट्रानेही यात मागे राहू नये, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

शासनाच्या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित झालेल्या पत्रकारांना, पुरस्कार जाहीर होताच थेट वरिष्ठ पत्रकार सन्मान योजनेचा लाभ लागू करण्यात यावा. शासनमान्य पेपर, टीव्ही, आणि १ लाखापेक्षा ज्यांचा रिच आहे त्यांना आधिस्वीकृती देण्यात यावी.आता आधिस्वीकृती असणाऱ्या माध्यमाना दुप्पट कोटा देण्यात यावा.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना' तातडीने अंमलात आणण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. या योजनेसाठी १०० कोटी रुपये 'शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधी'मध्ये ठेवले गेले असले, तरी ११,००० हून अधिक पात्र पत्रकारांना आजवर केवळ २० हजारांचेही मानधन मिळालेले नाही. ही योजना सध्या बँक व्याजावर अवलंबून असल्याने अंमलबजावणीत सातत्य राहत नाही.

त्यामुळे मध्यप्रदेश सरकारच्या धर्तीवर माहिती व जनसंपर्क विभागाअंतर्गत स्वतंत्र लेखाशीर्ष तयार करून दरवर्षी किमान २५ ते ३० कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी, अशी ठोस व दूरदृष्टीची मागणी श्री. संदीप काळे यांनी बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांसमोर ठेवली.

या बैठकीदरम्यान शासनाच्या वतीने काही सकारात्मक संकेत देण्यात आले असून, लवकरच या प्रस्तावांवर निर्णय घेतला जाईल, अशी अपेक्षा व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी व्यक्त केली.